MHRG110000672026

<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.०५/२०२६ मधील नि.१ वर आदेश</u>

अर्जदार श्वेता संदेश खाडे यांनी प्रस्तुतचा अर्ज '**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ५०३**' अंतर्गत गुन्हा क्र. ०२०९/२०२४ मध्ये जप्त केलेले सोन्याचे कानातील पेंडन्ट, सोन्याची नथ, सोन्याचे गंठण हे दागिने सुपुर्तनाम्यावर मिळण्याकरिता दाखल केलेले आहे.

२. सदर अर्जावर मी सरकारी वकिल साहेबांचे व तपासिक अधिकारी यांचे म्हणणे बोलाविले. सरकारी वकिल साहेबांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र.०६ कडे म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. तपासिक अधिकारी यांनी निशाणी क्र.०५ कडे म्हणणे दाखल करुन योग्य त्या अटी व शर्तीवर सोन्याचे दागिने देण्यास हरकत नसल्याचे सांगितले आहे.

३. सरकारी वकिल साहेब व सुपुर्तदाराचे वकिल साहेबांना मी विस्तुतपणे ऐकून घेतले. तसेच, संपूर्ण दस्तावेजाचे सुक्ष्मपणे अवलोकन केले.

४. दस्तावेजाचे अवलोकनावरुन दिसून येते की, तपासिक अधिकारी यांनी गुन्हा क्र.०२०९/२०२४ मध्ये उपरोक्त दागिने जप्त केलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये जप्त केलेले सोन्याचे दागिने हे अर्जदाराचे मालकीचे असल्याचे दर्शविण्याकरीता अर्जदाराने दि.१४.०१.२०२६ रोजीची पावतीची सत्यापित प्रत

निशाणी क्र.०९ कडे दाखल केली आहे. तसेच स्वतःचे आधारकार्डची साक्षांकित प्रत निशाणी क्र.१० कडे अभिलेखावर दाखल केली आहे.

५. उपरोक्त नमुद दस्तावेजाचे अवलोकनावरुन स्पष्ट होते की, प्रस्तुत गुन्ह्यातील जप्त सोन्याचे दागिने हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याबाबत तपासी अंमलदार यांनी व आरोपीने कथन करुन अर्जदाराच्या ताब्यात देण्यात हरकत नसल्याचे सांगितले आहे. परंतु जप्त दागिने अर्जदारास देण्यात अभियोगपक्ष हरकत घेतली आहे. अर्जदाराने जप्त सोन्याच्या दागिन्याची पावती अभिलेखावर दाखल केलेली असल्याने सदर पावतीचे अवलोकनावरुन असे प्रथमदर्शनी निदर्शनास येते की, उपरोक्त जप्त सोन्याच्या दागिन्यांपैकी झुमके व कानचैन तसेच मंगळसुत्र या वस्तु निशाणी क्र.०९ वरील अर्जदाराच्या नावे असलेल्या पावतीमध्ये अर्जदाराने खरेदी केल्याचे दर्शवितात. परंतु अर्जदाराने सोन्याच्या नथीची पावती दाखल केलेली नाही. त्यामुळे सोन्याची नथ अर्जदाराच्या मालकीची असल्याबाबत अथवा अर्जदार कायदेशीर कब्जेदार असल्याबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा नाही. त्यामुळे अर्जात नमूद सोन्याची नथ अर्जदाराच्या ताब्यात देणे न्यायोचित वाटत नाही. प्रथमदर्शनी केवळ कानातील झुमके व कानचैन तसेच मंगळसुत्र निशाणी क्र.०९ वरील पावतीप्रमाणे अर्जदारास देण्यास हरकत दिसून येत नाही. म्हणून अर्जदार याला जप्त केलेल्या सोन्याचे दागिन्यांचा म्हणजे कानातील झुमके व कानचैन तसेच मंगळसुत्र निशाणी क्र.०९ वरील पावतीप्रमाणे अंतरिम ताबा देणे न्यायोचित वाटते. जप्त केलेल्या सोन्याचे दागिन्यांवर अर्जदारा शिवाय इतर कोणीही मालकी हक्क किंवा इतर कोणत्याही प्रकारचा अधिकार दर्शविलेला नाही.

६. तपासिक अधिका-यांनी सदर प्रकणामधील जप्त सोन्याचे दागिने पोलीस स्टेशनला ठेवलेले आहे. उपरोक्त नमुद सोन्याचे दागिने दैनंदिन वापर केला नाही तर दिर्घ कालावधीपर्यत पोलीस स्टेशनमध्ये निरुपयोगी पडून राहिल्यास निश्चितच सोन्याचे दागिने वापरात येणार नाहीत व अर्जदाराला त्या दागिन्यांचा उपभोग घेता येणार नाही.

तसेच, अर्जदाराचे नुकसान होईल. अशा परिस्थितीमध्ये उपरोक्त नमुद सोन्याचे दागिने सुपूर्तनाम्यावर योग्य अटी लादुन अर्जदाराच्या ताब्यामध्ये न दिल्यास नुकसान होईल. उपरोक्त नमुद सोन्याचे दागिने पोलीस स्टेशनमध्ये दिर्घ कालावधीपर्यत निरुपयोगी ठेवल्यास कोणताही उद्देश सार्थक होणार नाही.

७. वरील कारणमिमांसा लक्षात घेवून न्यायोचित होईल असा मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.–

**– : आ दे श :–**

सदरचा अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो.

१. गुन्हा क्र.०२०९/२०२४ मध्ये तपासिक अधिका–यांनी जप्त केलेले सोन्याचे कानातील झुमके व कानचैन तसेच मंगळसुत्र निशाणी क्र.०९ वरील पावतीप्रमाणे हे अर्जदार/खबर देणार – श्वेता संदेश खाडे **यांना रक्कम रुपये ५,००,०००/– (रुपये पाच लाख मात्र)** चा सुपुर्तनामा बॉड लिहुन दिल्यानंतर त्यांना खालील अटी–शर्तींचे अधिन राहुन सदर सोन्याच्या दागिन्यांचा ताबा देण्यात यावा.

अ. सुपुर्तदाराने उपरोक्त नमुद सोन्याचे दागिने विक्री किंवा गहाण ठेवु नये. तसेच, त्यावर कोणत्याही प्रकारचा बोजा लादु नये.

ब. सुपुर्तदाराने उपरोक्त नमुद सोन्याचे दागिने मालकी हक्कामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करु नये.

क. सुपुर्तदाराने स्वःखर्चाने उपरोक्त नमुद सोन्याचे दागिने दोन रंगीत छायाचित्रे काढावे, सदर फोटो व नंबर तपास अधिकारी यांना सुपुर्द करावे.

ड. तपास अधिका–यांनी उपरोक्त नमुद सोन्याचे दागिने सुपुर्तनाम्यावर सोडण्यापुर्वी त्याबाबतचा विस्तृत पंचनामा तयार करावा.

इ. तपास अधिका–यांनी किंवा न्यायालयांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे

सुपुर्तदारांनी उपरोक्त नमुद  सोन्याचे दागिने न्यायालयात हजर करावे.

ई.  याबाबत संबंधित पोलीस स्टेशनला यादी पाठवावी.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.04.07 17:59:58 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः–०७.०४.२०२६. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.